विस्तार शिक्षण संचालनालय
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला
फोन ०७२४ २२५८१७४ फॅक्स ०७२४ २२५८७३२

**दरपत्रक सुचना, अटी व शर्ती**

जा.क्र.संविशि/भांडार/ ५२८४ /२०२६
दि. २२/०७/२६.

प्रति,

१) संगणक माहिती प्रणाली कक्ष(ॲरीस),
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२) सुचना फलक
वि.शि.सं.,डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

३) विद्यापीठ अभियंता,
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

विषय :- दैनिक वर्तमानपत्राची रद्दी विकणेबाबत.

विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला येथील कार्यालयात ६ ते ७ वर्षापासून मराठी, हिंदी व इंग्रजी दैनिक वर्तमानपत्राची रद्दी असून अंदाजे १५ ते २० क्विंटल रद्दी आहे. दै.वर्तमानपत्राचीरद्दी विकायची असून नोंदणीकृत रद्दी खरेदीदाराकडून सीलबंद पाकीटामध्ये दर नमुद करण्याचे सूचित करण्यात येते. दै.वर्तमानपत्राची रद्दी पाहणी **कार्यालयीन दिवसात दुपारी १२.०० ते सायं.५.००** या कालावधीत करावी. निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होणा-या इच्छुक व्यक्ति/रद्दी खरेदीदार संस्थांनी खालील अटी व शर्तींचे अवलोकन करावे.

१) सीलबंद दरपत्रके **रू.५००/- (डीडी/बॅंकर्स चेक/एफडीआर) संचालक,विस्तार शिक्षण,डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला/Director, Ext.Edu., Dr. P.D.K.V.,Akola यांचे नावे दि.०७/०८/२०२६ पर्यंत वेळ-सायं. ५.०० वाजेपर्यंत** विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला येथे प्रत्यक्ष अथवा डाकेने सादर करावा.

२)सर्वात जास्त रकमेच्या निविदाधारकाची निविदा स्विकारण्यात येईल व कमी रक्कम नमुद केलेल्या निविदाधारकास रू.५००/-(डीडी/बॅंकर्स चेक/एफडीआर) परत करण्यात येईल.

३) **दि.०७/०८/२०२६ सायं.०५.०० पर्यंत प्राप्त** झालेल्या निविदेपैकी ज्या निविदा धारकांनी बंद लिफाफ्यात उच्चतम दर सादर केलेले आहेत त्यांना कळविण्यात येईल.उच्चतम दर सादर केलेल्या व्यक्तिने/संस्थेने ३ दिवसांच्या आत दै.वर्तमानपत्राच्या रद्दीची उचल करावी.

४)दै.वर्तमानपत्राच्या रद्दीची उचल संबंधित वाहतूक खर्च व इतर कुठल्याही प्रकारचा खर्च विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला यांचेकडून करण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

५) कोणतेही नुकसान,अपघात किंवा इतर बाबींकरीता हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६) सदर प्रक्रियेबाबत काही तक्रार असल्यास निविदा सादर करण्याच्या दिनांकापूर्वी किंवा प्रक्रिया पूर्ण होण्याआधी आक्षेप नोंदवावा, प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कुठल्याच तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

७)अंदाजित रक्कमेपेक्षा कमी रकमेचे दरपत्रक प्राप्त झाल्यास प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार तसेच दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार विस्तार शिक्षण संचालनालय,डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला हे कार्यालय स्वत:कडे राखून ठेवित आहे.

**संचालक, विस्तार शिक्षण**
**विस्तार शिक्षण संचालनालय**
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला